प्रेस नोट ता. ०४/११/२०२०

पोलीस स्टेशन - चाकण

दिनांक १७/०२/२०२१ रोजी सकाळी १५:०० वा. चे सुमारास चाकण ता. खेड जि. पुणे येथील मार्केटयार्ड शेजारी असलेल्या वाफगावकर चाळ, रुम नं. ३ येथुन ४ महिने वयाची मुलगी नामे धनश्री राजेंद्र नागपुरे हिस काम मागण्याचा बहाना करत आलेल्या अनोळखी महिलेने राहते घरातुन पळवुन नेले आहे बाबत फिर्यादी राजेंद्र प्रभाकर नागपुरे वय ५३ वर्षे धंदा खाजगी नोकरी रा. रुम नं. ३ वाफगावकर चाळ, मार्केटयार्ड शेजारी चाकण ता. खेड जि. पुणे यांनी फिर्याद दिलेली होती. सदर बाबत चाकण पोलीस स्टेशन गुरनं २११/२०२१ भा.द.वि. कलम ३६३ सह बालकांचे संरक्षण व काळजी अधिनियम कायदा कलम ७५ प्रमाणे दाखल करण्यात आलेला होता.

सदर संवेदनशिल गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन मा. पोलीस आयुक्त, श्री. कृष्ण प्रकाश साहेब, अपर पोलीस आयुक्त, श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ श्री. मंचक इपर, पोलीस उप आयुक्त गुन्हे, श्री.सुधिर हिरेमठ, सहा. पोलीस आयुक्त, श्री. रामचंद्र जाधव यांचे सुचना व मार्गदर्शना प्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक राजपूत यांनी पोलीस उप निरीक्षक विजय जगदाळे व पोलीस उप निरीक्षक प्रमोद कठोरे यांची दोन तपास पथके तयार केली. गुन्हयाचे तपासा दरम्यान सदर गुन्हयातील अपहरण झालेली मुलगी हि पुणे येथे शिक्षण घेत असलेल्या एक २४ ते २५ वयाचे तरुण व तरुणीचे प्रेमसंबंधातुन चाकण येथील एका दवाखान्यात सदर तरुण तरुणीने आपले नाव बदलुन फिर्यादीचे व तिचे पत्नीचे नाव आई वडील म्हणुन टाकुन सदर मुलीला जन्म दिला असल्याचे निष्पंन्न झाले व सदर जन्मलेली मुलगी हि फिर्यादी राजेंद्र प्रभाकर नागपुरे यांना देवुन टाकली तेंव्हा पासुन राजेंद्र नागपुरे हे सदर मुलीचे संगोपन करीत होते. फिर्याद देतांना राजेंद्र नागपुरे यांनी हि बाब पोलीसांपासुन लपवुन ठेवली व सदर मुलगी ही त्यांची स्वत:चीच आहे असे भासवले चाकण पोलीसांनी सखोल तपास केल्यावर वरील प्रमाणे सदर मुलगी तरुण तरुणीचे प्रेमसंबंधातुन जन्म झाल्याचे निष्पंन्न झाले आहे.

सदर सदर गुन्हयाचे तपाकामी नेमण्यात आलेल्या तपास पथकाने प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचेकडुन अनोळखी महिलेचे रेखाचित्र तयार करुन ते प्रसिध्द केले त्याच प्रमाणे गुन्हयाचे घटनेच्या परिसरातील सुमारे १०० पेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेरे तपासणी करुन व इतर तांत्रीक तपासाचे आधारावर सदर गुन्हयाचा कसुन तपास चालु होता. दरम्यान सदर गुन्हयाचे तपासात चाकण पोलीस स्टेशन कडील डी. बी. पथकाला गोपनीय बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, गुन्हयातील महिला आरोपीचे वर्णनाची बाई बालाजी नगर, मेदनकरवाडी परीरात गुन्हयाचे घटनेच्या अगोदर काही दिवस राहण्यासाठी होती व सदर गुन्हा घडले तारखेपासुन ती सदर ठिकाणी दिसत नाही. सदर बातमीचे आधारे गुन्हयातील आरोपी महिलेचे नाव व इतर महत्वाची माहिती प्राप्त करुन तसेच सदर बाईचे रेखाचीत्राचा अधार घेवुन तांत्रीक तपास करुन गुन्हयातील महिला आरोपी राणी शिवाजी यादव वय २८ वर्षे रा. कुत्तर विहीर आंबाजोगाई जि. बिड हिस गुन्हयातील अपहरण झालेल्या चार महिने वयाचे मुलीसह आंबाजोगाई जिल्हा बिड येथुन ताब्यात घेतले असुन तीचेकडे चौकशी केली असता सदर महिलेने सदर गुन्हा केल्याचे निष्पंन्न झालेले आहे. तीला व बाळाला ताब्यात घेवुन पुढील तपास चालु आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, श्री. कृष्ण प्रकाश साहेब, अपर पोलीस आयुक्त, श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ श्री. मंचक इप्पर, पोलीस उप आयुक्त गुन्हे, श्री.सुधिर हिरेमठ, सहा. पोलीस आयुक्त, श्री. रामचंद्र जाधव यांचे सुचना व मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अशोक राजपूत तसेच पोलीस उप निरीक्षक प्रमोद कठोरे, पोलीस उप निरीक्षक विजय जगदाळे, पोहवा सुरेश हिंगे, राजु जाधव, आर. एम. झनकर, पोलीस नाईक हनुमंत कांबळे, संदिप सोनवणे, अनिल गोरड, मच्छिंद्र भांबुरे, पोकॉ निखल वर्पे, विलास कांदे, मनोज साबळे, अशोक दिवटे, नितीन गुंजाळ, प्रदिप राळे, मपोकॉ सुप्रिया गायकवाड यांनी केलेली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक प्रमोद कठोरे हे करीत आहेत.

